# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-१
Phone No. - ०२०-२६१२३०६६/६७ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

जा.क्र. मरापप/ बापवि/२०२०/ 3350
दिनांक : ११/१२/२०२०
14/12/2020

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सर्व
२) शिक्षण निरीक्षक
मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

विषय :- महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०१९ पात्र विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०१९ मध्ये पात्र ठरलेल्या परीक्षार्थीची प्रमाणपत्रे वितरणासाठी सोबत पाठवित आहोत. संबंधित उमेदवाराचे शैक्षणिक, व्यावसायिक, जात वैधता प्रमाणपत्र, अंपगत्वाचे प्रमाणपत्र इ.तपासून संबंधित उमेदवार कागदपत्रानुसार पात्र असल्यास प्रमाणपत्राचे वितरण करावे.

आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पेपर निहाय १५ दिवसांत खालील विहित नमुन्यात परीक्षा परिषदेस सादर करावा.

| अ.क्र. | तपशिल | प्राप्त प्रमाणपत्र संख्या | वितरीत केलेली प्रमाणपत्र संख्या | शिल्लक प्रमाणपत्र संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पेपर क्र.१ पात्रता प्रमाणपत्र | 294 | ~~294~~ | - |
| २ | पेपर क्र.२ पात्रता प्रमाणपत्र (सामाजिकशास्त्रे) | 173 | | |
| ३ | पेपर क्र.२ पात्रता प्रमाणपत्र (गणित व विज्ञान) | 23 | | |
| ४ | एकूण प्रमाणपत्र | 490 | | |

सोबत १) जिल्हा निहाय, पेपर निहाय यादी २) प्रमाणपत्रे

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

१. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण (आयुक्त) कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रतिलिपी,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक/उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
१. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. विभागीय उपसंचालक सर्व विभाग.

E-New2016-TET2019-TET General letter

प्रमाणपत्र वितरणाचे काम खालील सूचना प्रमाणे करावे.

१. उमेदवारांनी खालील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या प्रती घेऊन महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

अ) महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्र प्रत

ब) महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रिका प्रत

क) डी.टी.एड उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र अथवा बी.एड.उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा गुणपत्रक

ड) आरक्षण प्रवर्गाचे जात/वैधता प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)

इ) अंपगत्वाचे प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)

फ) ओळखपत्र (आधार कार्ड, पॅनकार्ड,ड्राइव्हिंग लाईसन्स, निवडणूक ओळखपत्र इ.)

२. प्रमाणपत्र वितरणाची पेपर निहाय नोंद वही ठेवावी.

३. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ चे पात्रता प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्याला वितरित करताना प्रमाणपत्राच्या मागील पृष्ठावर संबंधित विद्यार्थ्याने शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे समक्ष स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्वाक्षरी घेऊन व संबंधितांच्या प्रमाणपत्रांची खात्री करुन शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी प्रमाणपत्र वितरीत करावे.

४. पात्र परीक्षार्थींना शिक्षणाधिकारी प्राथमिक/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेमार्फत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास शिक्षणाधिकारी प्राथमिक/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) लेखी तक्रार नोंदवावी. अर्जासोबत पुरावा दर्शक कागदपत्रे(गुणपत्रक) जोडावे. शिक्षणाधिकारी प्राथमिक/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी सदर तक्रारीची शहानिशा करुन अभिप्रायासह सदर तक्रारी परीक्षा परिषदेकडे त्वरीत पाठवाव्यात.